महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६१
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/ 3342 दिनांक : 18 NOV 2021

**अत्यंत महत्वाचे/अतितात्काळ/ई-मेलद्वारे**

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित,
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषयः - शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता संस्थांकडून महाडीबीटी पोर्टलवरील Institute Profile अद्ययावत करण्याबाबात...

संदर्भ : - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४५६, दि. १७/११/२०२१.

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे (संकेतस्थळ- www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निवार्हभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

संदर्भीय पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडीबीटी पोर्टल संस्थांसाठी Institute Profile अद्ययावत करण्यासाठी सुरु करण्यात आलेले आहे. तरी या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अंतर्गत सर्व माहिती जसे Fee details, Course Details इत्यादी अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. तसेच त्रुटी असलेली/चुकीची भरण्यात आलेल्या माहितीची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२ या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.